# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर.

जा.क्र.राप/विनिछसं/आस्था/शि.ऊ./२३/१६९९
विभाग नियंत्रक यांचे कार्यालय,
रा.प.छत्रपती संभाजीनगर दि.०३/०३/२०२३.

प्रति,
माननिय,

जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी यांचे कार्यालय, छत्रपती संभाजीनगर.
सहा- संचालक. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता.मार्गदर्शन केंद्र, छत्रपती संभाजीनगर.
प्राचार्य, मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगीक सुचना केंद्र, रेल्वेस्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर.
प्रकल्प अधिकारी, अदिवासी विकास प्रकल्प कार्यालय छत्रपती संभाजीनगर.
शासकीय तंत्र निकेतन (Govt. Polytechnic) छत्रपती संभाजीनगर.

विषय :- सत्र २०२३- २०२४ या सत्राकरिता एक वर्षासाठी शिकाऊ उमेदवारांची ऑनलाईन प्रक्रीयेव्दारे प्रशिक्षणार्थी म्हणून भरती करणे बाबत.
संदर्भ :- कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.११/२०१७ पत्र क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/युआर/ १५७७ दि.२२.०३.२०१७.

महोदय,

शिकाऊ उमेदवारी अधिनियम १९६१ नुसार या विभागात २०२३- २०२४ या सत्रासाठी कार्यशाळेकरीता तांत्रीक व्यवसायातील शिकाऊ उमेदवारांची एक वर्ष मुदती करीता भरती करावयाची आहे. त्या साठी आवश्यक असणारी शैक्षणीक पात्रता, भरावयाच्या जागा वयोमर्यादा प्रशिक्षण कालावधी इत्यादी बाबींचा खालील प्रमाणे उल्लेख करण्यात आलेला आहे.

| अ. क्र. | व्यवसाय नाव | भरावयाची जागांची संख्या | किमान शैक्षणीक अर्हता | वयोमर्यादा दि.१५.०३.२०२३ | विदयावेतन | प्रशिक्षण कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | मेकॅनिक मोटार व्हेईकल | ४५ | सरकारमान्य औद्योगीक प्रशिक्षण संस्थेतील मेकॅनिक मोटार व्हेईकल ट्रेड दोन वर्षाचा (I.T.I. ) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. | १८ ते ३८ वर्ष (मागास वर्गीयांसाठी ०५ वर्ष शिथीलक्षम ) | रु.१००२८/- (दरमहा) | एक वर्ष |
| २ | शिट मेटल वर्कर | १५ | सरकारमान्य औद्योगीक प्रशिक्षण संस्थेतील शिट मेटल वर्कर ट्रेड एक वर्षाचा (I.T.I. ) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. | १८ ते ३८ वर्ष (मागास वर्गीयांसाठी ०५ वर्ष शिथीलक्षम ) | रु.८९१४/- (दरमहा) | एक वर्ष |
| ३ | इलेक्ट्रीशियन | १० | सरकारमान्य औद्योगीक प्रशिक्षण संस्थेतील इलेक्ट्रीशियन ट्रेड दोन वर्षाचा (I.T.I. ) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. | १८ ते ३८ वर्ष (मागास वर्गीयांसाठी ०५ वर्ष शिथीलक्षम ) | रु.१००२८/- (दरमहा) | एक वर्ष |



Scanned with OKEN Scanner

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | मॅकेनिक (डिझेल) | ४५ | सरकारमान्य औद्योगीक प्रशिक्षण संस्थेतील मॅकेनिक (डिझेल) ट्रेड एक वर्षाचा (I.T.I. ) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. | १८ ते ३८ वर्ष (मागास वर्गीयांसाठी ०५ वर्ष शिथीलक्षम ) | रु. ८९१४/- (दरमहा) | एक वर्ष |
| ५ | वेल्डर | ६ | सरकारमान्य औद्योगीक प्रशिक्षण संस्थेतील वेल्डर ट्रेड एक वर्षाचा (I.T.I.) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. | १८ ते ३८ वर्ष (मागास वर्गीयांसाठी ०५ वर्ष शिथीलक्षम ) | रु. ८९१४/- (दरमहा) | एक वर्ष |
| ६ | मेकॅनिक मेकॅट्रोनिक्स | १० | सरकारमान्य औद्योगीक प्रशिक्षण संस्थेतील मेकॅनिक मेकॅट्रोनिक्स ट्रेड दोन वर्षाचा (I.T.I. ) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. | १८ ते ३८ वर्ष (मागास वर्गीयांसाठी ०५ वर्ष शिथीलक्षम ) | रु.१००२८/- (दरमहा) | एक वर्ष |
| ७ | अभियांत्रिकी पदवीधर (B.E.) (स्वयंचल अभियांत्रीकी [Automobile Engineering] व यांत्रिक पदवीधर [ B.E. Mechanical ] ) | १ (B.E.)<br>२ B.E. Mechanical | उमेदवार हा कोणत्याही सरकार मान्य संस्थेतील यंत्र किंवा मोटार अभियांत्रिकी पदवीधर असणे आवश्यक | १८ ते ३८ वर्ष (मागास वर्गीयांसाठी ०५ वर्ष शिथीलक्षम ) | रु.९०००/- (दरमहा) | एक वर्ष |

शिकाऊ उमेदवार निवडीकरिता संगणकीय प्रणाली सुरू झाल्याने शिकाऊ उमेदवारी सत्र २०२३-२०२४ करीता आय.टी.आय. प्रशिक्षीत प्रत्येक उमेदवाराने शिकाऊ उमेदवारी करणे करिता Skill India पोर्टल वरील www.apprenticeshipindia.org या वेबसाईटवर ऑनलाईन रजीस्ट्रेशन करणे आवश्यक आहे. व अभियांत्रिकी पदवीधर (B.E.) उमेदवारांनी NATS पोर्टल वरील www.mhrdnats.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन रजीस्ट्रेशन करणे आवश्य आहे. तसेच ऑनलाईन रजीस्ट्रेशन केलेल्या व नोदणी क्रमांक मिळालेल्या उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येत आहे.

उपरोक्त I.T.I. व्यवसाय उत्तीर्ण झालेल्या विदयार्थाना शिकाऊ उमेदवारीसाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांनी वर नमुद केल्याप्रमाणे Skill India पोर्टल वरील www.apprenticeshipindia.org या वेबसाईटवर M S R T C DIV CONTROLLER chhatrapati sambhaji nagar या आस्थापनेकरीता ऑनलाईन रजिस्ट्रेशन (अर्ज / अप्लाय) करतील, व M S R T C DIV CONTROLLER chhatrapati sambhaji nagar या आस्थापनेकरीता ऑनलाईन अप्लाय करावे. तसेच अभियांत्रिकी पदवीधर (B.E.) उमेदवारांनी NATS पोर्टल वरील www.mhrdnats.gov.in या वेब साईटवर M S R T C (chhatrapati sambhaji nagar Division ) आस्थापनेकरीता ऑनलाईन रजिस्ट्रेशन (अर्ज / अप्लाय) करतील. त्याच उमेदवारांना शिकाऊ उमेदवारी करता येईल.

उमेदवारांनी ऑनलाईन रजिस्ट्रेशन केल्यानंतर त्यांनी या कार्यालयास दि.०३.०३.२०२३ ते १५.०३.२०२३ पर्यंत (रविवार व सुटटीचे दिवस वगळुन) सकाळी ११:०० ते १५:०० वेळेत विभागीय कार्यालय, म.रा.मा.प. महामंडळ, समर्थ नगर, छत्रपती संभाजीनगर येथे रजिस्ट्रेशनची झेरॉक्स प्रत व खालील कागदपत्रे सादर करावी. अर्ज स्वीकारण्याची अंतीम तारीख १५.०३.२०२३ रोजी १५.०० पर्यंत राहील. त्यानंतर आलेल्या अर्जाचा



Scanned with OKEN Scanner

विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. अर्जदाराने अर्जासोबत शिकाऊ उमेदवारी करु इच्छिना-या उमेदवारांनी खुला प्रवर्ग करिता रु.५००+रु.९० (१८%GST) = रु.५९०/- (पाचशे नव्वद फक्त) व मागासवर्गीय प्रवर्गा करिता रु.२५०+रु.४५ (१८%GST) = रु.२९५/- (दोनशे पंच्यानौ फक्त) या प्रमाणे रकमेचा डिमांड ड्राफ्ट (डी.डी.) M.S.R.T.C.FUND ACCOUNT या नावाने राष्ट्रीय बँकेच्या D.D. (डिमांड ड्राफ्ट) अर्जा सोबत जोडणे आवश्यक आहे. डिमांड ड्राफ्टच्या मागे उमेदवारांनी त्यांचे नाव व पत्ता, मोबाईल क्रमांक आणि ट्रेडचे नाव ठळक अक्षरात लिहीने अत्यंत आवश्यक आहे. उमेदवाराने दिलेले शुल्क परत केले जाणार नाही.

१. शाळा सोडल्याचा दाखल (टी.सी.).
२. एस.एस.सी.उत्तीर्ण गुणपत्रक व इतर शैक्षणिक पात्रतेचा दाखला.
३. आय.टी.आय. गुणपत्रक सर्व सेमीस्टर, बंद पाकीटात स्वतंत्र जोडणे आवश्सक
४. बी.ई उमेदवारांनी गुणपत्रक सर्व सेमीस्टर, बंद पाकीटात स्वतंत्र जोडणे आवश्सक
५. जातीचे प्रमाणपत्र.
६. आधारकार्ड छायांकीत प्रत.
७. ऑनलाईन रजीस्ट्रेशन फार्म/ APPLEY केल्याची प्रत
८. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व खुला प्रवर्गाचे उमेदवार वगळून इतर मागासवर्गातील उमेदवारांने नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र जोडणे आवश्यक.
९. शिकाउ उमेदवारा करिता उमेदवारांचे वय १८ ते ३८ मागासवर्गीय करिता ०५ वर्श शिथिलक्षम.
१०. पासपोर्ट साईज फोटो.

- उमेदवाराने I.T.I. व्यवसाय उत्तीर्ण झाले पासुन ०३ वर्षाच्या आत शिकाऊ उमेदवारी करणे बंधनकारक आहे. ०३ वर्षा पुढिल शिकाऊ उमेदवाराचे अर्ज स्विकाराले जाणार नाही. तसेच सरकारी अथवा खाजगी कंपनीत एकदा शिकाऊ उमेदवारी कायद्यानुसार शिकाऊ उमेदवारी केली असल्यास ते शिकाऊ उमेदवारी करिता पात्र होऊ शकत नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

-सही-
विभाग नियंत्रक
रा.प.छत्रपती संभाजीनगर

प्रत :- महाव्यवस्थापक (क.व.औ.स.) रा.प.मध्यवर्ती कार्यालय मुंबई- ०८.
प्रत :- उप महाव्यवस्थापक नियंत्रण समीती क्र.०२ छत्रपती संभाजीनगर / नाशिक प्रदेश रा.प.मध्यवर्ती कार्यालय यांना माहितीस्तव सादर.
प्रत :- यंत्र अभियंता (चा) / उप यंत्र अभियंता / वि.वा.अ./ वि.क.व.अ./ वि.ले.अ./ वि.वा.अ.(अ.प.)/ वि.भां.अ./ व.सु.व.द.अ./ का.अ./ वि.अधि.(स्था). रा.प. छत्रपती संभाजीनगर.
प्रत :- आगार प्रमुख रा.प. छत्रपती संभाजीनगर क्र.02/ छत्रपती संभाजीनगर क्र.01/ पैठण/ कन्नड/ गंगापुर/ वैजापूर/ सिल्लोड/ सोयगाव
सदर जाहिरात सुचना फलकावरती प्रसिध्द करण्यात यावी.

विभाग नियंत्रक
रा.प.छत्रपती संभाजीनगर

Bharti Mej File No-2

Scanned with OKEN Scanner